# विपश्यना

साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

बुद्धवर्ष २५५७, मार्गशीर्ष पौर्णिमा, १७ डिसेंबर, २०१३ वर्ष २ अंक १०

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः - http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


**धम्मवाणी**

**वाचानुरक्खी मनसा सुसंवुतो, कायेन च नाकुसलं कयिरा।**
**एते तयो कम्मपथे विसोधये, आराधये मग्गमिसिप्पवेदितं॥**

*धम्मपद- २८१, मग्गवग्गो.*

वाणीला संयमित ठेवावे, मनाला संयमित ठेवावे आणि शरीराने कोणतेही अकुशल (पापकर्म) करू नये. ह्या तिन्ही कर्मपथांना (कर्मेद्रियांना) शुद्ध ठेवावे. ऋषींच्या (बुद्धांच्या) सांगितलेल्या (आर्य अष्टांगिक) मार्गाचे अनुसरण करावे.

## आंतरिक शांतीचे धर्मदूतः श्री सत्यनारायणजी गोयन्का

*(मागील अंकाचा पुढील भाग ...२ ...)*

### स्वर्णिम वर्ष –

श्री गोयन्काजींना भारतात येण्याची प्रथम संधी १९६९ मध्ये प्राप्त झाली. त्यांचे आई- वडील त्यापूर्वीच भारतात आले होते आणि येथे त्यांच्या आई आजारी पडल्या. सरकार श्री गोयन्काजींना भारतात जाऊन आजारी आईला बघण्याची अनुमती देण्यास तयार होते.

भारताची यात्रा आरंभ होण्यापूर्वी सयाजी ऊ बा खिनांनी त्यांना विधिवत विपश्यनेचे आचार्य नियुक्त केले. म्यंमात भारतीयांसाठी दोन अशी शिबिर लागली, ज्यात सयाजींच्या सान्निध्यात श्री गोयन्काजींनी शिबिराचे संचालन केले. तेथे शिबिराची तशीच जागा निवडली गेली, जशी त्यांना भारतात मिळणार होती. मांडले शहरातील बाजाराच्या छतावर एक शिबिर लागले, जे दोन सिनेमाघरांच्या मध्यभागी होते. तेथे सिनेसंगीत मोठ्या आवाजात वाजत राहात असे. निवासासाठी बांबूच्या चटयांनी बनलेल्या झोपड्या होत्या. परंतु साधक ह्यामुळे थोडेसेही विचलित झाले नाहीत आणि श्री गोयन्काजींना आपल्या आचार्यांच्या सान्निध्यात असे विपश्यना शिबिर संचालित करण्याचे सौभाग्य प्राप्त झाले.

पहिल्या वेळी सयाजींच्या बाजूला बसून श्री गोयन्काजींनी अशा प्रकारचे प्रवचन दिले की ज्यामुळे ते खूप लोकप्रिय झाले. शिबिरात सर्व साधक भारतीय होते, त्यामुळे श्री गोयन्काजींनी प्रवचन हिंदीत दिले. सयाजींना हिंदी समजत होते, परंतु ते बोलू शकत नव्हते. पुष्कळदा ते वाकून श्री गोयन्काजींच्या कानात हळूच म्हणायचे जसे – आता यांना बुद्धांच्या काही शिष्यांबाबत सांग, माता विशाखाबाबत सांग, अंगुलिमालबाबत सांग इत्यादी. त्यानुसार श्री गोयन्काजी आपले सांगणे सोडून सयाजींच्या निर्देशानुसार प्रवचन देऊ लागत. नंतर ते म्हणू लागले की प्रवचन देणे त्यांच्यासाठी तसेच स्वाभाविक झाले होते, जसे पाण्याचा नळ उघडणे. कुठल्याही प्रयासाविना तोंडातून शब्दांचा धाराप्रवाह निघत असे.

### भारतात

जून १९६९ मध्ये श्री गोयन्काजी रंगूनहून कलकत्त्याला (भारत) विमानाने आले. आचार्य सयाजींचा ते जेव्हा निरोप घेत होते तेव्हा सयाजी त्यांना म्हणाले होते "तुम्ही एकटे जात नाही आहात, मी जात आहे आणि धर्म सोबत जात आहे". सयाजी ऊ बा खिन स्वतः म्यंमा सोडून जाऊ शकत नव्हते परंतु ते आपल्या प्रिय शिष्याला धर्मदूताप्रमाणे आपल्या प्रतिनिधीच्या रूपाने पाठवित होते.

श्री गोयन्काजींना ह्या बाबीची माहिती होती की हा एक ऐतिहासिक क्षण आहे, तरीही त्यांच्या मनात हाच विचार सुरू होता की भारतात त्यांचे राहणे काही दिवसांसाठीच असेल, ते लवकरच आपल्या प्रिय मातृभूमीला व आदरणीय आचार्यांजवळ परत येतील. परंतु सत्य तर हे आहे की ते २० वर्षानंतरच मंम्यात परत येऊ शकले.



*श्री सत्यनारायण गोयन्का,*
*जानेवारी ३०, १९२४ ते सप्टेंबर २९, २०१३*

ते त्या देशात आले जेथे त्यांना खूप कमी लोक जाणत होते आणि भगवान बुद्धांच्या शिकवणुकीला तिरस्काराच्या दृष्टीने पाहात होते. 'विपश्यना' शब्दही लोक विसरून गेले होते. परंतु आपल्या परिवाराच्या सहकार्याने श्री गोयन्काजी लवकरच मुंबईत प्रथम दहा-दिवसीय शिबिर आयोजीत करण्यात सफल झाले. ह्या शिबिरात सामील होणाऱ्यात त्यांचे आई-वडील, काही अन्य लोक आणि फ्रांसची एक महिला होती. शिबिराच्या शेवटच्या दिवशी त्या महिलेने श्री गोयन्काजींना आपल्या देशात येण्याचे निमंत्रण दिले. श्री गोयन्काजींनी तिला दहा वर्षांनंतर निमंत्रित करण्यासाठी सांगितले.

एका शिबिरानंतर दुसरे, नंतर तिसरे ह्या प्रकारे धर्मचक्र आपल्या जन्मभूमीत पुन्हा फिरू लागले. ते समजले की सध्या म्यंमामध्ये परतण्यासाठी प्रतीक्षा करावी लागेल. येथील लोक विपश्यनेच्या विधीला शिकण्यासाठी खूप उत्सुक होते. धर्मदूत याचा कसा अस्वीकार करू शकेल!

श्री गोयन्काजी देशाच्या एका टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत खूप गर्दीने भरलेल्या भारतीय रेल्वेने, तृतीय श्रेणीतून यात्रा करीत असत. कोणी जुना साधक तर नव्हता जो त्यांची मदत करेल, त्यामुळे ते जेथे कोठे शिबिर लावण्यासाठी जायचे तेथील व्यवस्थेवरही लक्ष ठेवायचे. भोजनाच्या वेळी साधकांसोबत बसून भोजनही करायचे. अनेक स्थानांवर मंडपच ध्यान-कक्षाचे काम करायचा. राजगीरात एका रात्री मंडप वादळाने उडून गेला. परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी श्री गोयन्काजी आपल्या धम्मासनावर विराजमान होते आणि साधकांना

उत्साहित करण्यासाठी प्रात:कालीन दैनिक वंदना करीत होते.

परिस्थिती खूप खराब होती. त्यांच्याजवळ पैसेही कमी होते आणि सहायकही कमी होते. काही कालावधीपर्यंत ते एकटेच होते कारण त्यांची पत्नी श्रीमती इलायची देवी (साधक त्यांना 'माताजी' म्हणतात.) म्यंमातच होत्या. तरीही ते आनंदी दिसत असत, कारण ते तेच काम करीत होते ज्यासाठी त्यांचा जन्म झाला होता.

त्या सुरवातीच्या वर्षात ते केवळ हिंदीतूनच विपश्यना शिकवायचे. इंग्रजी त्यांना येत होते परंतु तेवढेच जितके त्यांच्या व्यापार इत्यादीसाठी आवश्यक होते. ते विचार करीत होते की इंग्रजी भाषेवर त्यांचे तेवढे प्रभुत्व नाही जितके विपश्यना शिकविण्यासाठी आवष्यक आहे. परंतु जशी-जशी त्यांची प्रसिद्धी वाढत गेली, तसे-तसे विदेशी साधक त्यांच्याकडून साधना शिकण्याची व त्यांना प्रवचन देण्याची मागणी करू लागले.


सन १९६९ च्या अंती वा सन १९७० च्या प्रारंभी पश्चिमी देशांचे बरेचसे लोक भारतात आले. ते एखाद्या अशा नवीन गोष्टीचा (अध्यात्माचा) शोध घेत होते ज्याबाबत ते स्वत:ही जाणत नव्हते.

त्यापैकी काही लोकांनी श्री गोयन्काजींना शिबिरात बसण्याची परवानगी मागितली, परंतु श्री गोयन्काजींनी आपली भाषेसंबधी अडचण त्यांना सांगितली. त्यामुळे निराश न होता साधकांनी सयाजी. ऊ बा खिनांना बर्मा येथे पत्र पाठविले. लवकरच सयाजींचा रंगूनवरून एक संदेश आला, ज्यात श्री गोयन्काजींना त्या साधकांना शिबिरात बसू देण्याचा आणि इंग्रजीत शिबिर संचालन करण्याचा आदेश होता. नेहमीप्रमाणे श्री गोयन्काजींनी आपल्या आचार्यांच्या आदेशाचे पालन केले.

इंग्रजीतून संचालित प्रथम शिबिर १९७० मध्ये डलहौजी येथे आयोजित झाले. डलहौजी हिमालयात एक पहाडी प्रवासी स्थळ आहे. तेथे व नंतर बोधगयेत, जेथे बुद्धांना संबोधी प्राप्त झाली होती, पश्चिमी देशातून आलेल्या साधकांची श्री गोयन्काजीकडे सतत रांग लागली. त्यापैकी काही तर अर्धे नग्न राहायचे आणि हिंदू सन्याश्यांप्रमाणे लांब केसांच्या जटा ठेवायचे. काही तर तसे कपडे घालायचे जसे प्रवासी लोक समुद्र किनाऱ्यावर फिरण्यासाठी जातांना घालतात. अधिकतर पुरुषांची दाढी वाढलेली राहायची आणि अधिकतर महिलांचे केस पाठीवर मोकळे पसरलेले राहायचे. त्या महिला केसांचा आंबाडा बांधीत नसत, जशा भारतीय महिला केस विंचरून बांधतात. तरीही त्यांच्या अस्त-व्यस्त चेहेऱ्यांचा श्री गोयन्काजींवर काहीही प्रभाव पडला नाही. जे कोणी त्यांच्याजवळ आले त्या सर्वांना त्यांनी धर्म वाटला. काहींनी दहा-दिवसीय शिबिर केले आणि नंतर कधीही दिसले नाहीत. काही ज्या देशात श्री गोयन्काजी जायचे, तेथे जाऊन त्यांचे शिबिर करायचे. त्यापैकी काही लोक तसे होते जे नंतर भिन्न-भिन्न परंपरांशी जुळून खूप प्रसिद्ध झाले. काही असे आहेत ज्यांना श्री गोयन्काजींनी विपश्यनेचे सहायक आचार्य, वरिष्ठ सहायक आचार्य व आचार्य नियुक्त केले.

लवकरच कॉफीच्या दुकानात, रेस्टॉरन्टमध्ये जेथे पश्चिमी यात्री भोजन करायचे. तेथे विपश्यना शिबिराच्या तारखांची सूचना दिली जाऊ लागली. कधी-कधी तर श्री गोयन्काजींचा उल्लेख 'गायक गुरू'च्या रूपात केला जात होता कारण त्यांचा आवाज मधुर आणि गंभीर होता. ह्याच मधुर आणि गंभीर स्वरात ते बुद्धांव्दारे म्हटलेल्या गाथांचे व हिंदी तसेच राजस्थानीत स्वरचित दोह्यांचा पाठ करायचे. गारठलेल्या सकाळी व संध्याकाळी ध्यान कक्षाच्या शांत वातावरणात त्यांचा आवाज हवेत गुंजत राहायचा जो लोकांना शांत करायचा, मार्गाचे निर्देशन करायचा व उत्साहित करायचा.

शिबिर जेव्हा आरंभ व्हायचे, तेव्हा ते येऊन धम्मासनावर चुपचाप बसायचे आणि शांतीपूर्वक तेव्हापर्यंत प्रतीक्षा करायचे जेव्हापर्यंत साधक आपआपल्या जागी आसनांवर बसून चूप होत नसत. त्यानंतर ते बोलावयास सुरवात करावयाचे आणि काही क्षणातच त्या तुटक्या-फुटक्या भाड्याने घेतलेल्या कक्षाचे अथवा हवेशीर तंबूचा कायापालट व्हायचा व जेथे सर्व आपल्या आंतरिक सत्याचे मोहक अन्वेषण करण्यात मग्न होऊन जात. श्री गोयन्काजी तासनतास आपल्या साधकांजवळ राहायचे. ते जे काही करायचे ते सर्व जीवंत व्हायचे– मग त्या बुद्धांच्या गाथा असोत, दिवसा विपश्यना कशी करावी हे शिकविणे असो, अथवा सायंकाळचे प्रवचन असो. धर्मच त्यांच्या मुखातून प्रवाहित व्हायचा.



*दक्षिण भारतातील चेन्नई शिबिर समारोपानंतर साधकांसोबत पू. गुरुजी व माताजी*

रोज रात्री ९ वाजता कार्यक्रम समाप्त व्हायचा. दिवसाचा आरंभ पहाटेच व्हायचा. पूर्ण दिवसभर काम करून साधक थकून जायचे. परंतु बहुदा सर्व ध्यान कक्षातच राहायचे. ते संध्याकाळी विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या संधीला घालवू इच्छित नव्हते. साधक रांगेत उभे राहायचे अथवा श्री गोयन्काजींच्या आसनाजवळ गर्दी करायचे. काही प्रश्नकर्ते तर स्पष्ट रूपाने श्री गोयन्काजींना आव्हान देऊ इच्छित होते आणि काही त्यांच्याशी वाद-विवाद ही करू इच्छित असत. काही तर असे होते जे यथार्थ रूपाने आता काय करावे हे न समजणारे होते अथवा अशांत होते. काही हे इच्छित होते की श्री गोयन्काजींनी त्यांच्या दृष्टीलाच योग्य मानावे. काही त्यांनाच चुकीचे सिद्ध करू इच्छित होते. श्री गोयन्काजी स्मित करीत, खूपच प्रेमाने हसत-हसत एक-एक करून नेहमी सर्वांच्या प्रश्नांचे उत्तर द्यायचे, त्यांना समजवायचे. त्यानंतर जरी त्यांना त्यांचे शब्द लक्षात राहात नसत, परंतु त्यांना वाटायचे की त्यांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले आहे.

शिबिराच्या अंती ते समारोपाचे भाषण करीत आणि काही वेळापर्यंत साधकांसोबत ध्यान करीत. त्यानंतर ते ध्यान कक्षातून हिंदीत 'सर्वांचे मंगल होवो' उच्चारित बाहेर निघत असत. हळू-हळू त्यांचा आवाज मंद मंद होत शांत होत असे. साधक भारताच्या एखाद्या शहराच्या तुटक्या-फुटक्या खोलीत परत जात, जेथे फेरीवाले आपले सामान विकण्यासाठी ओरडत असत अथवा कुत्रे भुंकत असत. तेथे ते आपल्या मित्रांना अथवा आपल्या प्रियेला भेटत, पत्र लिहीत, वाचन करीत अथवा रेल्वे पकडणे इत्यादी पुढील योजना बनवीत.

परंतु पुष्कळशा साधकांमध्ये खूप काही बदल आढळायचे. आता त्यांचे जीवन पूर्वीसारखे राहिलेले नसायचे.

### ऋण फेडण्याचा उपाय

श्री गोयन्काजी आपले आचार्य सयाजी ऊ बा खिनांना वरील सर्व बाबींच्या सूचना पाठवीत राहायचे. ऊ बा खिनांना ह्यांच्या पत्रांना वाचण्यात मोठी रूची होती. एका शिबिरात ३७ साधक बसले आणि ऊ बा खिनांनी प्रसन्नता व्यक्त करीत म्हटले ३७ साधक अर्थात ३७ बोधिपक्षीय धर्म. बोधिपक्षीय धर्म हा पाली साहित्यातील एक पारिभाषिक शब्द आहे. जेव्हा श्री गोयन्काजींनी लिहीले की त्यांनी १०० साधकांचे एक शिबिर संचालित केले तेव्हा सयाजी खूपच प्रसन्न

झाले. त्या वेळी लोकांच्या मनात हा विचारही आला नसेल की पुढे जाऊन हे शिबिरही छोटे समजले जाईल.

जानेवारी १९७१ मध्ये श्री गोयन्काजी बर्मीज बौद्ध विहार, बोधगयेत शिबिर संचालन करीत होते. त्यावेळी एक टेलिग्राम आला. सयाजी ऊ बा खिन आता ह्या जगात राहिले नाहीत. श्री गोयन्काजींनी साधकांना म्हटले, "प्रकाश विझला." त्यांना सयाजींचा अभाव जाणवला. परंतु लवकरच त्यांनी हा अनुभव केला की सयाजींचे सान्निध्य त्यांना पूर्वीपेक्षाही जास्त प्राप्त झाले आहे. त्यांना वाटले जणू सयाजींनी भारतात येऊन त्यांची सोबत करणे सुरू केले आहे.

विपश्यनेचे शिबिर आयोजित करण्याशिवाय आता अजून काय करण्यासारखे होते? त्यांच्या आचार्यांनी त्यांची सहायता तेव्हा केली होती जेव्हा त्यांना माईग्रेनपासून सुटका होण्याचा कोणताही उपाय नव्हता. सयाजी ऊ बा खिनांनी खूपच प्रेमाने त्यांना विपश्यनेचा विधी शिकविला आणि असे प्रशिक्षण दिले ज्यामुळे ते स्वतः शिकवू शकतील. त्यांनी श्री गोयन्काजींना आचार्याच्या रूपाने नियुक्त केले होते आणि त्यांना एक ध्येय देऊन भारतात पाठविले होते. ते ह्या ध्येयाच्या सफलतेसाठी जीवन अंतापर्यंत काम करू इच्छित होते. शिबिराच्या प्रत्येक दिवसाच्या प्रातःकालच्या स्मरणात ते म्हणायचे –

**रोम रोम कृतज्ञ झाले, ऋण न चुकविले जाय।**
**जगू जीवन धर्माचेच, दुखीस वाटू धर्म सुख, हाची उचित उपाय॥**

त्यांनी हेच केले. भारताच्या दक्षिण भागापासून हिमालयापर्यंत, पश्चिम गुजरात व राजस्थानच्या वाळवंटापासून बंगालपर्यंत गोयन्काजी सतत जात-येत असत. प्राकृतिक दृश्य बदलले, चेहरे बदलले, त्यांच्यातही परिवर्तन झाले, ते म्हातारे झाले, परंतु धर्मयात्रा सुरू राहिली.

## धम्मगिरी

सुरवातीच्या काही वर्षांपर्यंत शिबिराचे स्थान सुनिश्चित नव्हते. कोणत्याही आश्रमात, कोणत्याही विहारात, कोणत्याही चर्चमध्ये, कोणत्याही शाळेत, कधी धर्मशाळेत, कधी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात, कधी आरोग्य आश्रमात, जेथे कुठेही स्वस्तात निवास मिळेल, तेथे शिबिर आयोजित केले जायचे. प्रत्येक जागी काम तर चालून जायचे, परंतु प्रत्येक जागी काही ना काही कमी राहायची, असुविधा असायच्या. अशा प्रत्येक स्थानावर शिबिर लावण्याअगोदर काही कामे करावी लागत, काही नवीन बनवावे लागायचे आणि शिबिर समाप्त झाल्यावर त्याला तोडावेही लागायचे. त्यामुळे अशा स्थानाचा शोध सुरू झाला जे फक्त विपश्यना शिबिरासाठीच असावे, जेथे वर्षभर शिबिरच आयोजित केले जातील.

१९७३ च्या शेवटी श्री गोयन्काजी जेव्हा देवळालीचे शिबिर समाप्त करून मुंबईला परत येत होते तेव्हा रस्त्यात इगतपुरीत एक दुकानदार व नगरपालिकेच्या एका कर्मचाऱ्याने श्री गोयन्काजींच्या मोटारीला थांबण्याचा संकेत केला. शहराच्या बाहेर त्यांनी काही संभावित स्थळांना शोधले होते जेथे शिबिर आयोजित केले जाऊ शकत होते. त्यांनी श्री गोयन्काजींना त्या स्थळांना पाहण्याची विनंती केली. नाराजीनेच श्री गोयन्काजी तयार झाले. काही कालावधीपूर्वी पायाचे हाड मोडल्यामुळे त्यावर प्लास्टरही चढविले होते. त्यामुळे वेळ न गमविता ते त्वरित घरी परत जाऊ इच्छित होते.

प्रथम दोन जागा पाहिल्या ज्या स्पष्टतः शिबिरासाठी उपयुक्त नव्हत्या. एक अजून स्थान पाहावयाचे होते. त्यांची मोटार एका पायमार्गावर चालू लागली जो खूप दिवसांपासून वापरात नव्हता. ह्या पायमार्गाने ते एका छोट्या टेकडीवर आले जेथे मोठे मोठे आंब्याचे वृक्ष होते, ज्यांची सावली त्या जुन्या बंगल्यांवर पडत होती जे ब्रिटिश राज्यांच्या वेळी बनविले होते. काहींची अवस्था खूपच खराब होती. तेथे बकऱ्या चरत होत्या. एका बंगल्यातून बकऱ्या बाहेर निघत होत्या आणि त्यातच पुन्हा शिरत होत्या. ह्या टेकडीच्या मागे एक रिकामा पहाडही होता.

श्री गोयन्काजींनी काही क्षणांसाठी आपले डोळे बंद केले. त्या नंतर ते म्हणाले – "होय, हे योग्य स्थान आहे." त्वरित त्या व्यापाऱ्याने जो त्यांच्यासोबत चालत होता. या भूमीला विकत घेण्याबाबत सुचविले. पुढे जाऊन जे धम्मगिरी म्हणविले गेले ही त्याची सुरवात होती.

केंद्राचा प्रारंभ साध्या-सरळ प्रकारे झाला. पश्चिमी देशांचे काही साधकच येथे राहू लागले. त्यांनी श्री गोयन्काजींना विचारले की येथे राहतांना वेळ कसा घालवावा? त्यांनी उत्तर दिले – "ध्यान करा, ध्यान करा, आणि ध्यान करा. स्वतःला स्वच्छ करा आणि केंद्रालाही साफ करा." त्या लोकांनी काम करणे सुरू केले. विहिरीतून पाणी काढायचे आणि ब्रशने साफ करायचे. जेव्हा त्यांनी काही जागा साफ केली तेव्हा ते ६ ते ८ तासापर्यंत तेथे बसायचे आणि ध्यान करायचे. लवकरच अजून काही लोक आले, आणि मग निर्माण कार्य सुरू झाले. आक्टोबर १९७६ मध्ये अधिकृतपणे धम्मगिरीचे केंद्र सुरू झाले.

हा खूप आनंदाचा क्षण होता पण त्यासोबतच अडचणींचाही. जसे नेहमी होते तसेच निर्माणकार्यात उत्पन्नापेक्षा खूप अधिक खर्च झाला होता. ट्रस्टला ठेकेदाराला पैसे द्यायचे होते परंतु ट्रस्ट असमर्थ होता त्याच्याजवळ पैसे नव्हते. उदाहरणार्थ, नवीन बनलेल्या आचार्य निवासाचे पैसे देण्यासाठीही कोषात पैसे नव्हते. जेव्हा श्री गोयन्काजींना हे माहीत झाले. तेव्हा त्यांनी त्या निवासात राहणे नाकारले. आचार्य निवासात राहण्याऐवजी ते व त्यांच्या पत्नी माताजी एका डॉरमेटरीत राहायला गेले, जेथे नळ व शौचालयाची सुविधा नव्हती. डॉरमेटरीला लागून असलेल्या एका स्थानाला बांबूच्या चटईने घेरून त्यांच्यासाठी स्नान करण्याची व्यवस्था केली गेली. जसे इतर लोक ज्या शौचालयाचा उपयोग करायचे तसेच तेही त्याच शौचालयाचा उपयोग करीत असत. सहा महिन्यांपर्यंत धम्मगिरीवर शिबिर सुरू होते आणि ते ह्या अवस्थेत राहिले, जेव्हापर्यंत ट्रस्टने ठेकेदाराचे पैसे दिले नाहीत. शेवटी तेथील कोषात अजून पैसे जमा झाले. त्यानंतर खोली उभ्या राहिल्या आणि एका पगोड्याचे निर्माण कार्य प्रारंभ झाले; तसाच पगोडा जसा रगूंनमध्ये सयाजी ऊ बा खिनांच्या केंद्रावर होता. पश्चिमी देशाचे स्वयंसेवक आणि भारतीय मजूर मिळून काम करीत असत. बर्मिज विहार, बोधगयाचे निवासीय बरमी भिक्षू कलात्मक रचना आणि प्लास्टर करण्यात सहाय करण्यासाठी आले. १९७९ च्या प्रारंभी धम्मगिरीच्या पगोड्याचे विधिवत उद्घाटन झाले. त्या वेळी उपस्थित गणमान्यजनात सयामा डा म्या त्विन (ज्यांनी सयाजी ऊ बा खिनांच्या विपस्यना केंद्रावर त्यांचे सहाय आणि साधकांची सेवा केली होती)



*धम्मगिरी, इगतपुरीचा प्रारंभिक पॅगोडा, १९७९*

आणि त्यांचे पति ऊ छिट टिन होते (ज्यांनी सयाजी ऊ बा खिनांच्या सोबत सरकारी कार्यालयात काम केले होते.) काही दिवसानंतर एक अजून महत्वपूर्ण घटना घडली. श्री गोयन्काजी पहिले शिबिर संचालित करण्यासाठी विमानाने युरोपला गेले. ज्या महिलेने १० वर्षांपूर्वी श्री गोयन्काजींना आपल्या देशात येण्याचे निमंत्रण दिले होते, तिला श्री गोयन्काजींचे वचन लक्षात होते. तिने श्री गोयन्काजींशी संपर्क साधला आणि योग टिचर्सच्या फ्रेंच फेडरेशनतर्फे निमंत्रण पाठविले.

....*(क्रमशः- पुढील अंकी)* ('विपश्यना न्युजलेटर', आंतरराष्ट्रीय संस्करण; आक्टोबर २२,२०१३ तून साभार, अनुवाद-विपश्यना विशोधन विन्यास, इगतपुरी)

**धम्मपुण्ण पुण्यात बालशिबिर शिक्षकांची व धर्मसेवकांची कार्यशाला**

२२ जानेवारीला आर. सी. सी. ची सायं. ५ वाजता पासून २६ ला सायं ५ वाजेपर्यंत. सी. सी. टी ची २३ ला सायं ५ वाजेपासून संपेपर्यंत. धर्मसेवकांची २४ ला सायं ५ वाजेपासून संपेपर्यंत. २६ ला एक दिवसीय बालशिबिर कार्यशाला संपेपर्यंत.

## सयाजी ऊ बा खिनांच्या पुण्यतिथीनिमित्त पूज्य माताजींच्या सान्निध्यात एक दिवसीय महाशिबिर

**१९ जानेवारी**, २०१४, **रविवार, वेळ;** सकाळी ११ वाजेपासून दुपारी ४ वाजेपर्यंत, **'ग्लोबल विपश्यना पॅगोडा'** च्या मोठ्या धम्मकक्षात (डोम). **३ वाजता पूज्य गुरुजींच्या रेकॉर्डेड प्रवचनात साधना न केलेले लोकही बसू शकतात.** कृपया खालील फोन नंबरांवर अथवा ईमेलने त्वरित संपर्क करावा. **कृपया बुकिंग केल्याविना येवू नये. बुकिंग संपर्क;** मो. 09892855692, 09892855945, फोन नं.: 022-28451170,33747543,33747544, (**फोन बुकिंगः** सकाळी **११** ते सायं. **५** वाजेपर्यंत, रोज)

**ईमेल Regn: oneday@globalpagoda.org**
**Online Registration: www.oneday.globalpagoda.org**

## नव नियुक्त्या

### वरिष्ठ सहायक आचार्य

1. Mr. Rob Burt, New Zealand
2-3. Dr. John Geraets & Ms. Karen Weston, New Zealand
4. Mrs. Paula McVicker, Australia

### सहायक आचार्य

१. श्री दीपक नारखेडे, जलगांव
२. श्री विजय सिंह राजावत, मुंबई
३. श्री तक्षक पोद्दार, कोल्हापुर
४. श्री प्रवीण डागा, चेन्नई
५. श्री मोहन रेड्डी, रंगारेड्डी
६. श्री मारकंडेयुलू वेलामुरी, हैदराबाद
७. श्रीमती उर्मिला शर्मा, रेवा
8. Mr. Xavier Salvador, Spain
9. Mrs. Nelly Paillard, France
10. Mr. Yuval Noah Harari, Israel
11. Mr.Farhad Rodpour Falati, Iran
12. Mrs. Florence Qiaoling Fang, China
13. Ms. Jo Hsin Hsiao, Taiwan
14. Mr. Galen Foster, Canada
15-16. Mr. Patrick Murphy & Mrs. Tracy Hudson, USA
17. Mr. Craig D. Miller, USA
18. Ms. Jane Mcbride, USA

### बालशिबिर शिक्षक

१-२. श्री त्रिलोक शंकर . व श्रीमती ममता शर्मा, जोधपुर
३-४. श्री रमेश चंद्र व श्रीमती अपर्णा श्रीवास्तव, रावतभाटा
५. श्री रतनलाल शर्मा, रावतभाटा
६. श्रीमती प्रेमसखी सोनी, जोधपुर
७. कु. मुमताज खान, चूरू
८. श्रीमती स्नेहलता बौद्ध, चूरू
९. श्रीमती नीना कपूर, पटना
१०. श्रीमती कामिनी बोमजेन, दार्जीलिंग
११. श्रीमती रश्मि मंगल, अहमदाबाद
१२. श्री किरन साहू, औरंगाबाद
१३. श्रीमती मंजु डहाट, औरंगाबाद
१४. श्री मनोज खंडारे, औरंगाबाद
१५. श्रीमती किरोनकुमारी मिश्रा, ''
१६. श्री डुशिंग कारभारी, औरंगाबाद
१७. श्री देवीदास हिवाले, औरंगाबाद
१८, श्रीमती रश्मि गोगटे, जालना
१९. श्री राजेंद्र रत्नपारखी, जालना
२०. श्री सुधीर बिरले, लातूर
२१. श्री राजेश पोखरीकर, नांदेड
22. Mrs. Corinna Sharrief, USA
23. Mrs. Ami Fletcher, USA
24. Ms. Salina Gomez, USA
25. Mr.Pradeep Jonnalagadda, USA
26. Ms. Chloe Goode, USA
27-28. Mr. Praveen Krishnamurthy & Mrs. Afreen Malim, USA
29. Mr. Brian McNamara USA
30. Ms. Genevieve Herreria USA
31. Mrs. Stella Hill, USA
32. Mr. Deepak Lakhi Dubai
33. Mrs. Algirmaa Baljinnyam, Mongolia 34.. Mrs. Burnee Tsendjav, Mongolia
35. Mrs. Oyuna Erdene, Mongolia
36. Mrs. Tsolmon Natsag, Mongolia
37. Mrs. Bayanjargal Gotsoo, Mongolia 38. Mrs. Tsogzolmaa Namchin, Mongolia
39. Ms. Khaing Than Oo, Myanmar
40. M. May Thet Htar, "
41. Mr. Win Maung , "
42. Ms. Su Hlaing Aung,"
43. Ms. Mu Mu Soe, Myanmar
44. Mr. U Ohn Pe Myint, Myanmar

## दोहे धर्माचे

**सद्गुरु करुणा जागली, दिला धर्माचा सार।**
**संप्रदाय ओझ्याचा, उतरे डोई भार॥**

**धन्य! धन्य! गुरुवर मिळे, असले संत सुजान।**
**सुटल्या खोट्या कल्पना, सुटले खोटे ज्ञान॥**

**गुरुवर! अंतर जगात, जागली सत्य ज्योत।**
**होय प्रकाश धर्माचा, अंतर्मन ओतप्रोत॥**

**काम क्रोधाच्या पूरी, बुडलोच मध्यधार।**
**गुरुवरा ओढले वरी, दिला धर्म आधार॥**

## दोहे धर्माचे

**जर गुरु मिळाले नसते, धर्मगंगच्या तीर।**
**गंगा पूजली असती, प्याले नसते नीर॥**

**झाली असती धर्माची, चर्चा स्तुतीच जाण।**
**मनुष्य जन्म संपुनही, अतृप्त असता प्राण॥**

**मिथ्या कल्पित ज्ञानाने, करतो वादविवाद।**
**गुरवरविन कसा चाखे, सत्य धर्माचा स्वाद॥**

**सद्गुरुविना ना मिळता, शुद्ध धर्म प्रकाश।**
**मोह निशा ना संपती, ना तुटता भवपाश॥**

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org